# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०२/२०१८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. ०३/०२/२०१८ रोजी सभा सुचना क्र. ०७ दि. ३०/०१/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. धृवकिशोर पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | मा. सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४. | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | सदस्य |
| ५. | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६. | श्रीम. रावल मेघना दिपक | सदस्या |
| ७. | श्री. विरानी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ८. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ९. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १०. | श्रीम. दिप्ती भट्ट | सदस्या |
| ११. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| २. | श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश | सदस्य |
| ३. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| ४. | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | सदस्या |
| ५. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**प्र. नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. ०३/०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०७ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे**. प्रकरण क्र ७५, **मालमत्ता कर आकारणी करीता भाडेमुल्याचे वाढीव दरास मंजूरी मिळणेबाबत**. (**मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.३२, दि. ३०/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.४५ व दि. १५/०१/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.५७**)

**प्रशांत दळवी :-**

सभापती महोदय माझी विनंती आहे स्टॅन्डींग कमिटी जेव्हा पासून अंमलात आली आहे. आपल्या इकडे बैठका सुरु झाल्या आहेत. सभापती महोदय त्या दिवसापासून आपण बघतो की, कमिशनर पण ह्या मिटींगला हजर राहत नाही. ॲक्च्युअली कमिशनरने काय ठरवले आहे यायचे नाही का, ही महत्वाची बैठक आहे. वाटत नाही का स्टॅन्डीग कमिटीची बैठक महत्वाची आहे म्हणून. अशा प्रकारचा खुलासा सभापती महोदय तुम्हाला आयुक्तांनी केला आहे का? आणि प्रत्येक वेळेला आपण बोलतात की प्रभाग अधिकारी किती उपस्थित आहेत, किती एच.ओ.डी. उपस्थित आहेत. आणि हे जर नसतील तर त्यांनी निरोप पाठवला आहे का कोणाकडे? सचिव साहेब तुम्हाला काही निरोप आहे का की प्रभाग अधिकारी नाहीत म्हणून. म्हणजे आयुक्तांनी सांगितले आहे का प्रभाग अधिका[illegible]ांनी की जायचच नाही म्हणून मिटींगला. सभापती महोदय असे होणार असेल तर आम्ही पण सदस्य म्हणून इकडे याच्यापूढे उपस्थित राहणार नाही. आम्ही काम घेवून येतो इकडे कोणाकडे बोलणार. सभागृहामध्ये स्टॅन्डिंग कमिटीची महत्वाची बैठक असते. आणि त्यावेळेला जर प्रभाग अधिकारी उपस्थित नसतील वारंवार सांगून सुध्दा कमिशनरला पण असे वाटत नसेल की ही महत्वाची बैठक आहे. कशाला करायच्या बैठका मग. प्रभागातील नगरसेवकांना नागरिकांना आम्हांला तोंड द्यावे लागते वेळोवेळी. काम होत नाहीत. सगळे काम ठप्प झालेली आहेत. आपण म्हणता एक तर्फी सरकार आलेले आहे. काही होत नाही पण इकडे. आज बघा प्रभाग क्र. १७ मध्ये त्या प्रभाग क्र. ०५ मध्ये, ०६ मध्ये पूर्ण फेरिवाल्यांचा वेढा आहे तिकडे. सकाळी कारवाई होते आणि संध्याकाळी परत तेच फेरिवाले तिकडे येऊन बसतात रस्त्यावरती. काय चाललय फक्त देखावा करायचा आहे का? लोकांसमोर निवडणूका झाल्या २१ फेब्रुवारीला आता सहा महिने पूर्ण होतील. एक ही काम झालेले नाही. फक्त उत्तर द्यायची की निधी उपलब्ध नाही. हे उपलब्ध नाही कर्मचारी उपलब्ध नाही अशा प्रकारची स्पष्टीकरणाची पत्रव्यवहार पाठवत बसायची. लोकांना आम्ही पत्र वाटत बसायची का? सभापती महोदय ह्याचा

ह्या विषयावरती खुलासा द्यायला पाहिजे. प्रभाग अधिकारी आणि एच.ओ.डी. का उपस्थित नाही त्याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे.

**मा. सभापती :-**

म्हसाळ साहेबांनी माहिती द्यावी.

**विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त मु.) :-**

प्रभाग अधिकारींना आपण बैठकांना स्थायी समितीला उपस्थित राहण्याबद्दल कळवले आहे. प्रभाग अधिकारी इथे आहेत. एक रजेवरती आहे. ०६ पैकी एक रजेवरती आहे. पाच आहेत आणि सकाळी कारवाई करायला गेले आहेत लोक.

**प्रशांत दळवी :-**

सभापती महोदय, आयुक्त महोदय आपण गेल्या वेळेलाही रुलींग दिली होती कारवाईचे प्रत्येक वेळेला स्टॅन्डिंगची महत्वाची बैठक असते. एखादा कारवाई करु शकता. जर सहा मधले एकच प्रभाग अधिकारी उपस्थित असतील दोन प्रभाग अधिकारी उपस्थित असतील असे चालते का? कारवाई का दुपार नंतर होत नाही का? सभापती महोदय माझी विनंती आहे आणि सभा चालू देणार नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

तीन प्रभाग समितीचे प्रभाग अधिकारी उपस्थित आहेत.

**प्रशांत दळवी :-**

महत्वाच्या बैठका आहेत. आज तो विषय घ्यायचा होता तो ही विषय आला नाही. महिला दिवस ८ मार्चला आहे. तो विषय आला नाही गोषवा�ात. मला काही कळत नाही की महिला दिवस साजरा करायचा की नाही करायचा त्याचे उत्तर द्या.

**सुरेश खंडेलवाल :-**

सर ऑलरेडी सांगितले होते की आपण गोषवारा आर्थिक प्रशासकीयसाठी द्या. स्टॅन्डिंगमध्ये पण गोषवारा दिला नाही. साहेब आणि महिला बालकल्याण म्हणजे महिलांच्या सक्षमीकरणासाठी काय होणार मला सांगा. वीस तारखेला महासभेमध्ये तुमच समजा नाही झाली महासभा तर काय करणार मग महिला बालकल्याण दिवस साजरा करायचा की नाही करायचा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

गोषवारा दिलेला आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब, महासभेचा गोषवारा ठिक आहे. पण स्टॅन्डीग कमिटीला तुम्हाला निवेदन दिलेले होते. निवेदनच करतो, दुसरे काहिच करत नाही. साहेब, तुम्हाला निवेदन दिले होते की, तुम्ही आर्थिक प्रशासकीय मंजूरी घेवून टाका आणि तुमची प्रोसीजर चालु करा. पुढे कसे होणार सांगा तुम्ही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो आर्थिक प्रशासकीय मंजूरी हा विषय धोरणात्मक निर्णय असल्यामुळे महासभेला विषय दिलेला आहे. आता त्याला पुर्नविनियोजनच पैसे उपलब्ध करुन देणे संदर्भातला विषय असल्यामुळे तो काही विषय घेतला नाही. महासभेला विषय आहे महासभेला धोरण झाल्यानंतर...........

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब २० तारखेला झाल्यानंतर नाही होणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यावे लागेल. महासभा झाल्यानंतर आपण स्टॅन्डिंग लावू आणि लगेच गेल्या गेल्या हा विषय घेवू.

**सुरेश खंडेलवाल :-**

मग आता घेतला असता तर काय प्रॉब्लेम होतो. आम्ही फक्त मंजूरी देतो तुम्हाला बाकीचे तुम्हाला थोडी धोरण ठरवतो. फक्त तुम्हाला आर्थिक प्रशासकीय मंजूरी देऊन तुम्हाला अधिकार देतो. तुम्ही प्रोसीजर चालू केली असती.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

धोरण झाल्यानंतर आर्थिक प्रशासकीय मंजूरी कशाला कसे देणार. कोणता विषय ते कुठून देणार. तरतूद उपलब्ध नाही. तरतूद उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे आपल्याला.

**मेघना रावल :-**

महिला जागतिक दिन आज पुरे इंडिया में केंद्र में, महाराष्ट्र में सब जगह महिला जागतिक दिन के लिए प्रेशराईज हो रहा है की करना चाहिए और हमारे यहाँ क्या हो रहा है कुछ नही।

**प्रशांत दळवी :-**

साहेब चुकीचा मॅसेज आहे हा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महासभा झाल्या झाल्या स्टॅन्डिंगला आपण करु साहेब.

**प्रशांत दळवी :-**

साहेब कधी होणार पण शक्य नाही होणार ते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जे अधिकार आहेत ते विषय ठेवले आहेत ना बिलींग ॲडव्हान्स जवळपास पूर्वी विषय दिला आहे महासभेला.

**अनिल विराणी :-**

सगळे सभापती हेच बोलतात महिला बालकल्याणचा विषय नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सभापतींच्या परवानगीने बोलतो ज्याला जे अधिकार आहेत जे प्राधिकरण अधिकार आहेत तो महासभेचा अधिकार आहे.

**अनिल विराणी :-**

हा विषय महासभेचा आहे हे कोणाला विचारायच आहे.

**प्रशांत दळवी :-**

प्रत्येक वेळेला स्टॅन्डिंगला आणि महासभेला वेठीस धरायचे.

**दिप्ती भट :-**

नोटिस काढणार होते अजून काय त्या नोटिस आल्या नाहीत.

**प्रशांत दळवी :-**

नोटिसचा काही फरक पडत नाही.

**अनिल विराणी :-**

एकदा कमिशनर सुध्दा आले नाहीत. आम्हाला दर्शन भेटले नाही.

**अनिता पाटील :-**

सभापती साहेब बरेच विषयाचे गोषवारे नाहीत आणि बरेच अधिकारी ज्यांचे विषय आहेत ते हजर नाहीत. आमचा असे पर्सनल मत आहे की ही सभा तुम्ही तहकूब करावी. सर्व अधिकारी असतील तेव्हा घ्या.

**अनिल विराणी :-**

जोपर्यंत कमिशनर साहेब हजर राहणार नाहीत तोपर्यंत सभा लावायची नाही.

**मिरादेवी यादव :-**

सभापती महोदय जो काम हो ही नही सकता है तो सभा लगाने का मतलब क्या है। लोग चुन के दिए है काम करने के लिए यहाँ पर काम ही नही हो रहा है। तो सभा लगाने का मतलब क्या है?

**प्रशांत दळवी :-**

फार कठीण परिस्थिती आहे. सर २१ फेब्रुवारीला सहा महिने पूर्ण होत आहेत. प्रभागात कसे वावरायचे साहेब सांगा तुम्ही मला आणि सोशल मिडीयावरती असे ठोक ठोक ठोकतात नगरसेवकांना वाटेल तसे लोकांना उत्तर देणे आम्हाला भाग पडले आहे. फक्त सुंदर मिरा भाईंदरचा नारा देतो. आयुक्त महोदय सी.एम. आल्यानंतर स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर जोर जोरात घोषणा होतात तिकडे आयुक्तांच्या परंतु वस्तुस्थिती काय आहे. पानपट्टे साहेब गेल्यावेळेला मी तुम्हाला सांगितले होते प्रभाग क्र. १७ मध्ये फेरिवाल्यांचा वेढा आहे आयुक्त महोदय आणि अस नाही की सकाळी आले आणि संध्याकाळी गाड्या घेऊन गेले असे पण नाही. जागेवरती गाड्या बांधून ठेवलेले आहेत. सफाई कर्मचा�यांना सफाई करता येत नाही. आज ३७ स्थायी कर्मचारी आमच्याकडे रेल्वे स्टेशनला आपण डिमांगेशन दिले आहे आजपर्यंत तिथे फेरिवाले बसलेले आहेत. का कारवाई करत नाही आता आम्ही विचारतो की अधिकारी कुठे गेले तुम्ही सांगतात की कारवाई करु.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे ज्या ठिकाणी शाळा, हॉस्पीटल, रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड तिथे पट्टे मारायचे आहेत. त्याप्रमाणे प्रोसीजर चालू आहे.

**अनिल विराणी :-**

पट्टे मारले आहेत १० ते १५ दिवस झाले.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

पट्टे मारले त्याच्यानंतर ही दुसरी गोष्ट आपल्याकडे जी फेरिवाले समिती गठीत करुन त्याची जी पुढची रिकंडीशनपर्यंत पुढची कारवाई करायची आहे. ती सुध्दा प्रक्रिया चालू आहे. आणि ह्या सगळ्या गोष्टी आपल्याला जिथे आपली जुना फेरिवाला ना फेरिवाला क्षेत्र होते त्या ठिकाणी आपली कारवाई चालू आहे. त्या ठिकाणी आपले पथके जाऊन गाड्या जप्त करणे त्यांचे माल सुध्दा जप्त करतात.

**अनिल विराणी :-**

ते आपण नविन करायचे. फेरिवाले ना फेरिवाले झोन जे अगोदर होते त्यांचे काय?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

अगोदरच्या ह्याच्यावरती ही कोर्टाचे तसेच निर्णय आहे. जी तुम्ही नविन समिती निर्माण केली आहे. करणार आता प्रोसेस सुरु आहे. नाव याद्या मागवलेल्या आहेत. त्याची प्रक्रिया चालू आहे तर ती लवकरात लवकर झाले तर हे पट्टे मारणे ह्या गोष्टी आपण त्यांना ठरवून दिलेल्या ठिकाणी नंतर ते बसतील.

**दिप्ती भट :-**

साहेब ३१ तारखेला मिटींग घेतली का आपण? फेरिवाल्यांसाठी कमिटीची काही कमिटी मेंबर केले. साहेब तुम्ही मोठे न्यूज पेपरमध्ये पण टाकत जा. मी संध्याकाळी पेपरमध्ये ०४ वाजता बघितले. आम्हाला पण वॉर्डामधून कोणाला पाठवायचे असेल तर आम्ही कसे पाठवणार. साहेब दुसरे पण आहेत.

**अनिल विराणी :-**

साहेब प्रभागामध्ये जेवढे जनप्रतिनिधी आहेत त्यांना कळवा ना ही मिटींग ह्या दिवशी आहे म्हणून.

**दिप्ती भट :-**

न्यूज पेपरमध्ये दिलेले त्यांनी साहेब कुठल्या पेपरामध्ये दिलेल. एकच पेपर माझ्या हातात आले पुकार पेपरमध्ये दिलेल असे काही तरी आहे. बाकीमध्ये नाही. आपले मोठमोठे पेपर आहेत. टाईम्स ऑफ इंडिया हा महत्वाचा विषय आहे. फेरिवाल्यांचा महत्वाचा विषय आहे. एवढा मोठा न्यूज पेपरला टाकला असता तर बर झाले असते. लोकांना माहिती पडल असतं.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब पुजारी साहेब विषय असा आहे सदस्य पोटतिडकीने बोलतात की तुमच्या कामाच्या बरोबर नगरसेवक सन्मा. सदस्य तुमच्या सपोर्टला आहेत. परंतु तुमच्याकडून जो सपोर्ट पाहिजे तो सपोर्ट नाही. साहेब आता बघा अधिकारी किती उपस्थित आहेत. म्हणजे काय नगरसेवक थांबणार नाहीत का? अधिकारी उपस्थित रहायला पाहिजेत की नाहीत. मिटींगला उपस्थित नाहीत त्यांची संख्या कमी आहे. नंबर दोन आज फेरिवाल्यांचा एवढा विळखा पडलेला आहे. नंबर तीन विकास काम होत नाही. आज प्रशांतला सांगितले त्या मॅडमने की ८ मार्च जागतिक दिन मोठ्या उत्साहाने आपल्याला साजरा करायचा आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नाव उज्वल करायचे आहे. आणि एवढे सगळे करुन सुध्दा तुमच्याकडून गोषवारा येत नसेल तर एकदम चुकीची बाब आहे. आता बघा हे समजा सत्ताधारी आहेत. हे विरोधक आहेत. विरोधक सुध्दा बोलायला लागले आहेत. ही सभा तहकूब करा म्हणून. म्हणजे विचार करा की सगळे नगरसेवक त्रस्त झालेत. प्रशासनाच्या कारभारामुळे सगळे नगरसेवक त्रस्त आहेत. सगळ्या पक्षाची ही नाराजी त्यांनी आज बोलून दाखवली. आज अनिता पाटील मॅडम बोलल्या, दिप्ती मॅडम बोलल्या याचा अर्थ काय.

**प्रशांत दळवी :-**

आयुक्त महोदय सभापती महोदय सगळ्यांचे एकच प्रॉब्लेम आहेत फेरिवाल्यांचा सभापती महोदय फेरिवाला समिती गठीत करावी हा राज्य शासनाचा, केंद्र सरकारचा निर्णय आहे. हे कधी आले आपल्याकडे. फेरिवाला समिती गठीत करणे हा राज्य शासनाने आपल्याकडे कधी पाठवल आहे.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. ती स्थगिती उठल्याबरोबर आपण प्रोव्हीजनमध्ये दिलेली आहे.

**प्रशांत दळवी :-**

चॅलेंज आहे साहेब अजून पाच वर्ष होणार नाही. गेली पाच वर्षे पण नाही झाली ह्या पाच वर्षात नाही होणार.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

मी तुम्हाला एक तासामध्ये किती मेंबर आहेत सर्व तुम्हाला लेखी स्वरुपात माहिती देतो.

**मा. सभापती :-**

तुम्ही आता का देत नाही. तुम्हाला माहिती आहे हा स्थायी समितीचा विषय आहे.

**प्रशांत दळवी :-**

कुठेपर्यंत आले सर काय प्रोसीजर आहे. आम्ही इथे लोक प्रतिनिधी निवडून आलो आहोत साहेब लोकांनी निवडून दिले आहे आम्हाला. साहेब वाईट वाटते आम्हाला सहा महिने पूर्ण होतील ३१ तारखेला कामे होत नाहीत, साफसफाई होत नाही. जीणे मुश्कील झाले आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

सर फेरिवाल्यांचा जो विषय आहे आताचे सर्व सदस्यांची जी भावना आहे पहिले त्याच्यामध्ये तुमचा आतापर्यंत तुम्ही सांगितले पेपरला नोटिस दिली आहे. त्यांची कमिटी बनवायची आहे त्याचे प्रोसीजर फास्ट करुन स्टॅन्डींगमध्ये ठेवायला पाहिजे होते.

**प्रशांत दळवी :-**

साहेब कमिटी झाली का? कमिटी गठीत झाली का साहेब प्लीज नावे सांगा कमिटी गठीत झाली असेल तर.

**मा. सभापती :-**

आज तुम्ही तुमची समिती गठीत केली ना साहेब त्याच्या अगोदर तुम्ही सगळ्या सदस्यांना सांगितले असते तर त्यांनी पण तुम्हाला सहकार्य केले असते.

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब आपण महासभेमध्ये काहीतरी ठराव केला होता. त्याच्यासाठी आपण समिती सर्व नेतेचे समिती केली आहे आपण.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कमिटी समिती स्थापन केली.

**दिपाली पोवार :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते फेरिवाला समितीची लास्ट डेट सोमवार होती. त्याच्यामध्ये प्रवर्ग ०४ आहे. प्रवर्ग एकमध्ये सर्व शासकीय अधिकारी आहेत. त्याचे ०६ मेंबर आहेत आणि एकूण ३० लोकांची कमिटी आहे. प्रवर्ग दोनमध्ये फेरिवाल्या संघटनेचे सदस्य प्रवर्ग तीनमध्ये सामाजिक संस्था आणि प्रवर्ग चारमध्ये जे वकील, डॉक्टर, आर्किटेक्ट यांचे प्रतिनिधी असोसिएशनचे तर त्याप्रमाणे प्रवर्ग एकमध्ये शासकीय आहेत ते ऑलरेडी फॉर्म आहेत. प्रवर्ग दोनमध्ये दहा अर्ज आले आहेत. प्रवर्ग तीनमध्ये दहा अर्ज आले आहेत. आणि प्रवर्ग चारमध्ये दहा अर्ज आले आहेत.

**दिप्ती भट :-**

जी कमिटी बसणार त्याच्यासाठी कमीत कमी दीड वर्षापासून मी फॉलोअप करते. आपल्याला माहिती आहे माझे पत्रव्यवहार लाईसन्स बनवण्यासाठी ते पण चालू आहे. मी गेल्यावेळेला पण आपल्याला सांगितले हे जे आहे त्याचे मला उत्तर द्या जेव्हा कमिटी गठीत करणार तेव्हा सांगा आम्हाला. तर ते आम्हाला कुणालाच माहिती नाही. हे चार वाजता मिटींगचे टाईम संपल त्या टाईमला मी पेपरामध्ये बघितले की आज फॉर्म होणार आहे. ॲटलिस्ट आम्हाला सांगायचे असते खूप जणांना एन.जी.ओ.नी सांगून ठेवले की आम्हाला सांगा आणि ते चांगले होते ते आम्ही सांगितल असते की आज मिटींग आहे.

**दिपाली पोवार :-**

मॅडम ती जाहिरात ऑलरेडी प्रसिध्दच आहे.

**दिप्ती भट :-**

कुठल्या कुठल्या पेपरमध्ये?

**दिपाली पोवार :-**

ती माहिती देते तुम्हाला. सर ह्याच्याबद्दल फेरिवाला समितीची जी कारवाई आहे त्याची सध्या स्थिती महासभेसमोर मांडलेली आहे.

**प्रशांत दळवी :-**

सद्यस्थिती काय आहे?

**दिपाली पोवार :-**

फेरिवाल्यांचा जेव्हा विषय घेतला महासभेमध्ये तेव्हा फेरिवाल्या बद्दलच्या समितीची फेरिवाला सर्वेक्षणाची सद्यस्थिती महासभेसमोर ठेवलेली होती आणि त्याच्यामध्ये सांगितले होते की समिती गठीत करण्याचं.........

**प्रशांत दळवी :-**

तत्कालीन आयुक्त अच्युत हांगे साहेब असताना समिती आपण गठीत केली होती त्याला सभागृहाने मान्यता पण दिली होती असे तुमचे म्हणणे आहे.

**दिपाली पोवार :-**

सभागृहाने मान्यता नाही तो अधिकारी आयुक्त साहेबांचा आहे समिती गठीत करायचा.

**प्रशांत दळवी :-**

सभागृहापुढे आणलं होतं महासभेपूढे आणली होती कमिटीला मान्यता द्यावी म्हणून.

**दिपाली पोवार :-**

कमिटीची मान्यता ही शासनाच्या नियमाप्रमाणे होते त्याला महासभेची मंजुरीचे त्याच्यामध्ये काही नमुद केलेले नाही.

**प्रशांत दळवी :-**

सभेपुढे आणले होते की नाही?

**दिपाली पोवार :-**

नाही.

**प्रशांत दळवी :-**

सभेपुढे मंजूरी देण्यात आली होती की नाही?

**दिपाली पोवार :-**

नाही.

**प्रशांत दळवी :-**

सभागृहापूढे आणले असेल प्रकरण असे तुम्ही नाही म्हणून म्हणत आहेत. आम्ही सभागृहात नव्हतो का?

**दिपाली पोवार :-**

सभागृहामध्ये तसे नाही सांगत आहे सर फेरिवाला ना फेरिवाला क्षेत्र जाहिर करण्यासाठी महासभेसमोर विषय घेण्यात आला होता.

**प्रशांत दळवी :-**

विषय घेण्यात आला होता ना.

**दिपाली पोवार :-**

८ तारखेच्या महासभेमध्ये तर तेव्हा गोषवारा नव्हता. फेरिवाला समिती ना फेरिवाला क्षेत्र फेरिवाला क्षेत्र बद्दलची माहिती सद्यस्थिती प्रशासनाने महासभेला कळवली आहे.

**प्रशांत दळवी :-**

आम्हाला कळत नाही सभागृहामध्ये आम्ही पण बसतो गेल्या पाच वर्ष.

**दिपाली पोवार :-**

आपण गोषवारा बघा ना सर.

**प्रशांत दळवी :-**

सचिव साहेब गोषवारा मागा महासभेचा.

**दिप्ती भट :-**

मॅडम आपल्याला सांगितलेले वारंवार की आम्हाला सांगा.

**प्रशांत दळवी :-**

आपण समिती गठीत केली होती तत्कालीन आयुक्त हांगे असताना तर त्याची नावे पण आहेत त्या नावाचे वाचन केले आहे सभागृहापूढे.

**दिप्ती भट :-**

कमिटी बनवायला सांगितले तेव्हा आम्हाला कळवायला सांगितलेल जर आम्हाला सगळ्यांना माहित नव्हते एक रिकवेस्ट आहे की सभापती साहेब थोडा टाईमींग वाढवून घ्या.

**प्रशांत दळवी :-**

प्रशासनाला काम करायची नाहीत. आपण लोकांना काय उत्तर द्यायची की आपण आता ठरवायची काय उत्तर द्यायची. ८ मार्चला जागतिक महिला दिन आहे. त्या जागतिक महिला दिनचे ही प्रशासनाने काही नियोजन केले नाही. आज अधिनियम अनुसुची ड प्रकरण २ प्रमाणे प्रस्ताव द्यायला पाहिजे होता तो ही दिलेला नाही. आणि म्हणून त्या निमित्त आम्हाला शंभर रिक्षा द्यायच्या होत्या. त्यावेळेला असा आपण ठरवल होत अशी चर्चा झाली होती. महापौर मॅडमकडे, आमदार साहेबांकडे तेही होऊ शकले नाही. स्थायी समिती बैठकीला अधिकारी उपस्थित नसतात फेरिवाल्यांचा मज्जाव आहे. रस्त्यांवरती भर दिवसा गाड्या लावतात विकास काम ठप्प झालेली आहेत आणि म्हणून सभापती महोदयांना सांगतो की जोपर्यंत ह्याला चालना भेटत नाही तोपर्यंत सभा तहकूब करण्यांत यावी.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेब सदस्यांच्या भावना लक्षात घ्या की ८ मार्चला महिला दिनानिमित्त आपल्याला १०० रिक्षांचे वाटप करायचे आहे. आयुक्तांच्या समोर चर्चा पण झाली होती. आयुक्तांनी तसे मान्य पण केले होते आणि २० फेब्रुवारीच्या मिटींगमध्ये आपण ते घेणार पण आहोत. पण हे जे ८ मार्च आणि २० फेब्रुवारी एकदम कट टू कट वेळ असल्यामुळे प्रशासनाला विनंती पण केली होती पण प्रशासनाने गोषवारा दिला नाही तसेच अधिकारी पण उपस्थित नाहीत. फेरिवाल्यांचा हैदोष वाढला आहे. विरोधी पक्ष सदस्य पण म्हणतात की वृक्षप्राधिकरण समितीचे सदस्य पण उपस्थित नाहीत. आणि त्याच्यानंतर फेरिवाला समिती हे गठीत करण्याचा प्रस्ताव जो महापालिकेने ॲडर्व्हटाईज केला होता त्याची माहिती सुध्दा मी स्थायी समिती सभापती मला सुध्दा सुध्दा दिली नाही. ही एकदम अक्षम्य बाबत आहे. माझी तुम्हाला विनंती आहे की फेरिवाला समितीची जी डेड लाईन दिली होती ती डेड लाईन वाढवण्यात यावी आणि सगळ्या सदस्यांना सांगण्यात यावे तोपर्यंत ही मिटींग तहकुब करतो आणि मिटींग संपली असे मी जाहिर करतो.

**सभा तहकुबी ठराव ६४ :-**

दि. ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना १०० रिक्षा उपलब्ध करणेबाबत प्रशासनाने अनुसुची ‘‘ड’’ प्रकरण २ कलम के अन्वये आजच्या स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर केला नाही. स्थायी समिती बैठकीला अधिकारी उपस्थित नाहीत, फेरिवाले महत्वाच्या रस्त्यावर बसत आहेत त्यांचेवर प्रशासन कारवाई करत नाही. विकास कामे होत नाहीत त्यामुळे सदर सभा तहकुब करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(सभा तहकुब झाल्याची वेळ सकाळी ११.५० वाजता)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका